# राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांवर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव

**डॉ. सुखदेव एस. उंदरे** सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश**

भारतीय संविधानात स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक असलेल्या गांधीजींच्या विचारांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. भारतीय संविधानातील राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (DPSP) एका न्याय्य आणि समतापूर्ण समाजाचे स्वप्न अधोरेखीत करतात. अशा समाजात राज्य सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सामाजिक-आर्थिक न्याय आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांवर गांधीजींच्या विचारांचा किती प्रभाव होता याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध पत्रातून करण्यात आला आहे.

**प्रस्तावना**

१९५० मध्ये स्वीकारलेले भारतीय संविधान हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचा दस्तऐवज म्हणून ओळखले जाते. संविधानाच्या विविध तरतुदींमध्ये, राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे (DPSP) एक आगळे स्थान असल्याचे स्पष्ट होते. ही तत्वे, जरी न्याय प्रविष्ट नसली तरी, शासन आणि सार्वजनिक धोरणासाठी मार्गदर्शक चौकट म्हणून काम करतात. लोकांचे, विशेषतः समाजातील उपेक्षित घटकांचे कल्याण करण्यासाठी आणि भारतात न्याय, समानता आणि प्रतिष्ठा कायम व्हावी यासाठी राज्याचे मार्गदर्शन करण्याचे त्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. गांधीजींनी स्वराज्य आणि सामाजिक सुधारणांची बाजू घेतली त्यामुळे नैतिक शासन, आर्थिक न्याय आणि वंचित व उपेक्षित समाज घटकांच्या उत्थानावर भर दिला. या सर्व बाबींचा भारतीय संविधानाच्या निर्माणकर्त्यांवर लक्षणीय प्रभाव पडला. सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि ग्रामीण विकासावरील गांधीजींचे विचार हे राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये (DPSP) विखुरले आहेत. मार्गदर्शक तत्त्वांना आणि एकूणच संविधानाच्या व्यापक दृष्टिकोनाला आकार देण्यात गांधीजींच्या विचारांची भूमिका शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध पत्राद्वारे करण्यात आला आहे.

**गांधीजींचे तत्वज्ञान**

महात्मा गांधींचे तत्वज्ञान सत्य (Truth) आणि अहिंसा (Non-Violence) या दोन सिद्धांतावर आधारित होते. तसेच शासन, सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता यावरील कल्पनांचाही त्यात समावेश होता. गांधीजींनी अशा समाजाची कल्पना केली जिथे आर्थिक विकास केवळ औद्योगिक विकासापुरता मर्यादित नव्हता, तर प्रत्येक व्यक्तीच्या, विशेषतः समाजातील उपेक्षित, वंचित घटकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याएवढा व्यापक होता. ग्रामीण स्वावलंबनाच्या शक्तीवर, विकेंद्रित शासनावर आणि श्रमाच्या प्रतिष्ठेवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. हा विश्वासच त्यांच्या अनेक सामाजिक-आर्थिक सुधारणांचा आधार होता.

**आर्थिक न्याय आणि सामाजिक कल्याण**

गांधीजी औद्योगिकीकरणावर टीका करत होते. औद्योगिकीकरणामुळे कामगार वर्गाचे शोषण झाले आणि काही लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण झाले असे त्यांचे स्पष्ट मत होते. गांधीजींच्या मते, न्याय्य आर्थिक व्यवस्थेचे उद्दिष्ट सर्वांचे, विशेषतः गरीब आणि दलितांचे कल्याण असावे. गांधीजींच्या विचारांचा राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांवर (Directive Principles of State Policy) खोलवर प्रभाव असल्याचे दिसून येते. विशेषतः आर्थिक न्याय आणि सामाजिक कल्याणाच्या संदर्भात. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे ही सामाजिक-आर्थिक समतेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्याला दिशा देणारी तत्त्वे आहेत. गांधीजींच्या अहिंसा, स्वावलंबन, सर्वोदय आणि ग्रामस्वराज्य या तत्त्वांचा मार्गदर्शक तत्त्वांवर खोलवर ठसा उमटलेला दिसतो. गांधीजींनी नेहमीच आर्थिक समतेच्या महत्त्वावर भर दिला होता. त्यांचे 'ट्रस्टीशिप' अर्थात 'विश्वस्त' (Trusteeship) हे तत्त्व संपत्ती ही मूठभर लोकांच्या हातात केंद्रित न होता समाजाच्या कल्याणासाठी वापरली जावी हा भाव सूचित करते. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, विशेषतः अनुच्छेद ३९ मध्ये, राज्याने संपत्ती आणि उत्पादनाच्या साधनांचे केंद्रीकरण टाळावे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे नमूद आहे. गांधीजींच्या दृष्टिकोनातून हेच आर्थिक न्यायाचे मूळ तत्त्व असून त्यामुळे स्वाभाविकपणे समाजातून गरिबी आणि असमानता दूर करणे हे राज्याचे प्राथमिक कर्तव्य ठरते. गांधीजींच्या विचारांचा अनुच्छेद ४३ वर प्रभाव दिसतो, यानुसार ग्रामपंचायतींना प्रोत्साहन आणि कुटीर उद्योगांना चालना (Fadia: 2013: 137)देण्याचे उद्दिष्ट आहे. यावरून गांधीजींचा स्वावलंबनाचा विचार हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यावर केंद्रित होता हे स्पष्ट होते.

गांधीजींच्या 'सर्वोदय' संकल्पनेत सर्वांचे कल्याण अंतर्भूत आहे. विशेषतः समाजातील पीडित व उपेक्षित वर्गांचे उत्थान. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनुच्छेद ४६ हे अस्पृश्यता, शोषण आणि सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी अनुसूचित जाती-जमातींच्या कल्याणावर भर देते, जे गांधीजींच्या हरिजन कल्याणाच्या विचारांशी सुसंगत आहे. त्याचप्रमाणे, अनुच्छेद ४१ नुसार राज्याने बेरोजगारी, वृद्धापकाळ, आजारपण आणि अपंगत्व यांसारख्या काही महत्वाच्या विषयांबाबत शिक्षणाचा प्रसार, कामाचा अधिकार आणि सार्वजनिक सहाय्य करावयाचे आहे. या तरतुदीवर गांधीजींच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनाचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. गांधीजींनी महिलांचे सक्षमीकरण आणि बालकांचे संगोपन यांनाही महत्त्व दिले, जे अनुच्छेद ४२ आणि ४५ मध्ये प्रतिबिंबित होते. अनुच्छेद ४२ मधील तरतुदीप्रमाणे राज्य कामाच्या न्याय्य आणि मानवीय परिस्थिती आणि मातृत्वाच्या मदतीची तरतूद करेल. तर, राज्य हे राज्यघटना अंमलात आल्यापासून दहा वर्षाच्या आत, चौदा वर्ष वय पूर्ण होईपर्यंत सर्व मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करेल.

गांधीजींच्या विचारांचा प्रभाव असला तरी, आधुनिक औद्योगिकरण आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वांची पूर्ण अंमलबजावणी ही आव्हानात्मक ठरते. तरीही, आर्थिक न्याय आणि सामाजिक कल्याणाच्या बाबतीत गांधीजींचे तत्त्वज्ञान आजही प्रेरणादायी आहे. मार्गदर्शक तत्त्वे ही गांधीजींच्या आदर्शांना प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करतात, तेही अशा समाज व्यवस्थेत की ज्या ठिकाणी असमानता व अन्याय व्यवस्थेच्या खोलवर पसरलेला आहे. अशा परस्थितीत गांधीजींच्या विचारांनी आर्थिक समता आणि सामाजिक कल्याणाच्या माध्यमातून एक न्याय्य आणि समतावादी समाज निर्माण करण्याची दिशा मार्गदर्शक तत्त्वांना दिली आहे.

**गांधीजींची विकेंद्रीकरणाची संकल्पना आणि सामाजिक न्याय**

गांधीवादी व्यवस्थेमध्ये सत्तेचे अगदी निम्न स्तरापर्यंत विकेंद्रीकरण होते (काश्यप, गुप्त: २००६: ८९). गांधीजींनी ग्रामपंचायतींना लोकशाहीचा पाया मानला. राज्यघटनेच्या 'उद्देशिके'त म्हटल्याप्रमाणे 'to constitute', अर्थात 'घडवण' हे संविधानाचं निश्चित कार्य आहे (Khosla: 2012:16). असे निश्चित कार्य करीत राहणे हेच गांधीजीच्या जीवनाचे अंतिम साध्य होते, असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही. त्यांच्या मते, गावातील लोकांना त्यांच्या समस्या आणि गरजा मोठ्या शहरातील प्रशासकांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समजतात. संविधानातील अनुच्छेद ४० मध्ये ग्रामपंचायतींना स्वायत्त शासनाचे अधिकार देण्याची तरतूद गांधीजींच्या या विश्वासाला बळकटी देते. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या संदर्भात, विशेषतः अनुच्छेद ४० (पंचायत राज) वर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेला अधिक मजबूत केले, ज्यामुळे गांधीजींच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा मार्ग मोकळा झाला. या व्यवस्थेने स्थानिक स्तरावर लोकशाहीचा प्रसार केला आणि ग्रामीण भागात विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत झाली. गांधीजींसाठी सत्तेचे केंद्रीकरण हे शोषण आणि अन्यायाचे कारण होते. त्यांनी केंद्रीकृत शासनाऐवजी स्थानिक स्वशासनाला प्राधान्य दिले. त्यांच्या दृष्टिकोनातून, सत्ता जितकी लोकांच्या जवळ असेल, तितकी ती पारदर्शक, जबाबदार आणि लोककेंद्रित असेल. ग्रामस्वराज्य ही त्यांची आदर्श व्यवस्था होती, जिथे गावे स्वतःचे निर्णय घेतील, स्वतःच्या संसाधनांचे व्यवस्थापन करतील आणि स्वतःच्या विकासाचे नियोजन करतील. गांधीजींच्या या विचारांचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कलम ४० मध्ये दिसतो, ज्याचे उद्दिष्ट ग्रामपंचायतींना स्वायत्तता देण्याचे आणि त्यांना शासनाचे घटक बनवण्याचे आहे.

गांधीजींच्या स्वराज्याच्या संकल्पनेत सत्तेचे विकेंद्रीकरण हा मूलभूत घटक होता. त्यांनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली, जिथे गावे स्वयंपूर्ण, स्वावलंबी आणि स्वशासित असतील. त्यांच्या मते, जेव्हा सत्ता थेट लोकांच्या हाती, विशेषतः ग्रामीण स्तरावर, पोहोचेल, तेव्हाच खरे स्वराज्य प्रत्यक्षात येऊ शकेल. गांधीजींच्या विकेंद्रीकरणाच्या संकल्पनेत सामाजिक न्याय हा महत्त्वाचा पैलू होता. त्यांनी उपेक्षित वर्गांना सत्तेत सहभागी करून घेण्यावर भर दिला. पंचायत राज व्यवस्थेत महिलांसाठी आणि अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षणाची तरतूद ही गांधीजींच्या सर्वोदय आणि हरिजन कल्याणाच्या विचारांशी साधर्म्य सांगते. यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण केवळ प्रशासकीयच नव्हे, तर सामाजिक समतेचे साधन बनल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पंचायत राज च्या स्वरूपात दिसतो, परंतु त्याची पूर्ण अंमलबजावणी अजूनही होऊ शकलेली नाही. राजकीय हस्तक्षेप, निधीची कमतरता आणि प्रशासकीय अडथळे यामुळे ग्रामपंचायतींची स्वायत्तता पूर्णपणे आकाराला येऊ शकलेली नाही. असे असले तरीही, गांधीजींचे विकेंद्रीकरणाचे तत्त्व आजही ग्रामीण विकास आणि लोकशाहीच्या प्रसारासाठी प्रेरणादायी आहे. गांधीजींच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या विचारांनी मार्गदर्शक तत्त्वांमधील अनुच्छेद ४० ला दिशा दिली आहे. पंचायत राज ही त्यांच्या ग्रामस्वराज्याच्या स्वप्नाचे मूर्त स्वरूप आहे, जे

सत्तेला लोकांपर्यंत पोहोचवून खऱ्या अर्थाने स्वराज्य साकार करण्याचा प्रयत्न करते. गांधीजींचे तत्त्वज्ञान प्रशासनाला लोककेंद्रित आणि समावेशक बनवण्याची प्रेरणा देते, ज्यामुळे भारतीय लोकशाही अधिक मजबूत होऊ शकते.

**श्रमाच्या प्रतिष्ठेचे मूल्य:**

गांधीजींचा ग्रामीण विकास आणि स्वावलंबनावरचा भर हस्तकला, शेती आणि ग्रामीण उद्योगांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले यावरून दिसून येते. ग्रामीण भागाच्या उन्नतीसाठी आणि शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी राज्याने काम केले पाहिजे असे त्यांचे मत होते. गांधीजींसाठी श्रम हे केवळ आर्थिक उत्पादनाचे साधन नव्हते, तर ते मानवी प्रतिष्ठेचे आणि स्वावलंबनाचे प्रतीक होते. त्याचप्रमाणे, ग्रामीण विकास हा त्यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेचा गाभा होता, जिथे गावे ही स्वयंपूर्ण आणि समृद्ध समाजाची पायाभूत एकके मानली गेली. या विचारांचा ठसा भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांवर स्पष्टपणे उमटलेला आहे. गांधीजींनी 'श्रमाच्या पावित्र्यावर' (Sanctity of Labour) भर दिला आणि प्रत्येक व्यक्तीने शारीरिक श्रमाला महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, श्रम ही माणसाच्या आत्मसन्मानाची आणि समाजाशी जोडलेली बाब आहे. या विचारांचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांमधील अनुच्छेद ४१ मध्ये दिसतो, जिथे राज्याने सर्वांना कामाचा अधिकार, शिक्षण आणि गरजेच्या वेळी सार्वजनिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे नमूद आहे. त्याचबरोबर गांधीजींचा श्रमिकांना योग्य वेतन आणि मानवी हक्क मिळावेत, यावर भर होता, त्यांच्या या विचाराचे प्रतिबिंब अनुच्छेद ४३ मद्ये उमटलेले आहे. या अनुच्छेदामध्ये कामगारांना योग्य जीवनमान आणि सभ्य कामाच्या परिस्थितीची हमी दिली आहे. त्यांचे 'नई तालीम' हे शिक्षण तत्त्वज्ञानही श्रमाला शिक्षणाशी जोडते. गांधीजींच्या या विचारांनी मार्गदर्शक तत्त्वांना श्रम आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देण्याची दिशा दिली. तथापि, आधुनिक औद्योगिकरण आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेत या तत्त्वांची पूर्ण अंमलबजावणी करणे कठीण ठरले आहे. तरीही, गांधीजींचा श्रम आणि ग्रामीण विकासावरील भर आजही सामाजिक न्याय आणि समतेच्या दृष्टीने प्रासंगिक आहे. अशाप्रकारे, गांधीजींच्या विचारांनी श्रमाला प्रतिष्ठा आणि ग्रामीण विकासाला केंद्री स्थान देऊन मार्गदर्शक तत्त्वांद्वारे एक समृद्ध आणि स्वावलंबी समाज निर्माण करण्याचा मार्ग अनुसरला आहे.

**शासन व प्रशासनाचे नैतिक अधिष्ठान :**

गांधीजींचा असा विश्वास होता की, खऱ्या लोकशाही राज्याने केवळ राजकीय अधिकार सुनिश्चित केले पाहिजेत असे नाही तर नीतिमान शासनाचा पुरस्कार केला पाहिजे. यामध्ये राज्याने केवळ उच्चभ्रूंसाठीच नव्हे तर सर्वांच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे याची हे गांधीजींना अपेक्षित होते. गांधीजींची शासनाची संकल्पना नीतिमत्ता आणि नैतिकतेवर आधारित होती आणि त्यांचा असा युक्तिवाद होता की, सरकारने नेहमीच अहिंसा आणि सत्याच्या मार्गदर्शनाखाली आपल्या लोकांच्या सर्वोत्तम हितासाठी कार्य केले पाहिजे. न्याय आणि नैतिक शासनाचे आदर्श घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये प्रतिबिंबित होतात, जे राज्याला अशा पद्धतीने कार्य करण्यास निर्देशित करतात ज्यामुळे जनसामान्यांचा फायदा होतो आणि सामाजिक सुसंवाद वाढतो. गांधीजींसाठी शासन हे केवळ कायदे आणि नियमांचे संचालन नव्हते, तर ते नैतिकता, सत्य, अहिंसा आणि लोकांच्या कल्याणावर आधारित असावे, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या स्वराज्य आणि रामराज्याच्या संकल्पनांमध्ये प्रशासन हे लोकांच्या सेवेसाठी आणि नैतिक मूल्यांच्या अधिष्ठानावर चालणारे असावे, यावर भर होता. या विचारांचा प्रभाव मार्गदर्शक तत्त्वांतील विविध अनुच्छेदांवरून दिसून येतो. गांधीजींच्या मते, शासनाने सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वांचे पालन करावे. त्यांचे 'रामराज्य' हे एक आदर्श शासनाचे प्रतीक होते, जिथे प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळतो आणि प्रशासन लोकांच्या नैतिक कल्याणाला प्राधान्य देतो. मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३८ हे या विचाराशी सुसंगत आहे, जिथे राज्याने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय सुनिश्चित करून लोकांचे कल्याण साधावे, असे नमूद आहे. गांधीजींनी शासनाला लोकसेवक मानले, आणि हीच भावना मार्गदर्शक तत्त्वांमध्ये प्रशासनाला लोककेंद्रित आणि नीतिमान बनवण्याच्या उद्दिष्टातून व्यक्त होते.

**निष्कर्ष**

भारतीय संविधानातील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर महात्मा गांधींच्या विचारांचा खोलवर प्रभाव झालेला आढळून येतो. न्याय्य, समतापूर्ण आणि विकेंद्रित समाजासाठी गांधीजींचे विचार राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांतील तरतुदींमध्ये, विशेषतः सामाजिक कल्याण, ग्रामीण विकास, आर्थिक न्याय आणि श्रमाचा सन्मान यासारख्या क्षेत्रांमध्ये विखुरलेले आहे. राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वे कायदेशीररित्या अंमलात आणण्यायोग्य नसले तरी, ते प्रशासनासाठी एक नैतिक चौकट प्रदान करतात. संविधानाच्या निर्मितीदरम्यान गांधीजींच्या विचारांचे इतर प्रभावांशी संश्लेषण झाले असले तरी, नैतिक प्रशासन, ग्रामीण स्वावलंबन आणि सामाजिक न्याय यावर त्यांनी दिलेला भर आजही भारतातील धोरणकर्ते आणि

सार्वजनिक सेवकांना प्रेरणा देत आहे. मार्गदर्शक तत्वे, जरी न्याय्य नसली तरी, न्याय्य समाजासाठी गांधीजींचे विचार साकारण्यासाठी ते एका दीपस्तंभासारखे आहेत.

**संदर्भसूची:**

https://pib.gov.in/PressReleasePage.

Https://knowindia.india.gov.in.

Austin, Granville. (1966).The Indian Constitution: Cornerstone of a Nation. Oxford University Press.

Basu, D. D. (2024. ). Introduction to The Constitution of India. LexisNexis.

Bhatiya, Gautam. The Indian Constitution A Conversation with Power. HarperCollins India. 2025.

भोळे, भा. ल. (२०१५ ). भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण. पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स. नागपूर.

काश्यप सुभाष. गुप्त व्ही. पी. (२००६). भारतीय राजनीति सिद्धान्त समस्याए और सुधार. राधा पब्लिकेशन. नई दिल्ली.

Khosla, Madhav. (2012). The Indian Constitution. Oxford.

Fadia B. L. (2013). Indian Government and Politics. Sahitya Bhawan. Agra.

Yadav, Yogendra. (2020 ). Making Sense of Indian Democracy. Permanent Black.